राज्यातील दुष्काळी भागात सुरू असलेल्या जनावरांच्या चारा छावण्या दिनांक ३१.८.२०१९ पर्यत चालू ठेवण्यास परवानगी देण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०१९/प्र.क्र. ३० /म-७,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, विस्तार, मुंबई-४००.०३२

दिनांक : ३० जुलै, २०१९.

संदर्भ :- १. शासन निर्णय, महसुल व वन विभाग,क्र.: सीएलएस २०१५/प्र.क्र.४०/म-३, दि. १३.०५.२०१५
२. शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र.: एससीवाय २०१९/प्र.क्र.३०/म-७, दि. २५ .०१. २०१९
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-२०१८ / प्र.क्र.८९ / म-७, दि. ०८.०१.२०१९.
४. शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. : एससीवाय २०१९/प्र.क्र. ३० /म-७, दि. ६.७. २०१९

प्रस्तावना -

राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे त्या भागातील पशुधनासाठी आवश्यक असणारा चारा व पाणी उपलब्धतेबाबतचा गंभीर प्रश्न नजीकच्या कालावधीत निर्माण होण्याची शक्यता असल्याने, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये जनावरांच्या चारा छावण्या उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. मान्सूनचे विलंबाने झालेले अगमन व त्यामुळे चारा उपलब्ध होण्यासाठी कालावधी लागणार असल्याने सुरू करण्यात आलेल्या जनावरांच्या चारा छावण्या दिनांक १.८.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. राज्यात अद्यापि मान्सूनचा समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने चारा छावण्यांची मुदत पुन्हा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सन २०१९ मधील मान्सूनचे विलंबाने झालेले आगमन विचारात घेवून राज्यात अद्यापि समाधानकारक पाऊस झालेला नसल्यामुळे जनावरांसाठी चारा उपलब्ध होण्यासाठी अजून काही कालावधी लागणार असल्याने राज्यात दुष्काळी भागात जनावरांना चारा व पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्यांची मुदत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर आढावा घेऊन आवश्यकतेनुसार दिनांक ३१.८.२०१९ पर्यंत चारा छावण्या सुरू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. जनावरांच्या चारा छावण्यासंदर्भात पूर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

३ . सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०७३०१७०१३०४४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.30 17:13:12 +05'30'

(सु. ह.उमराणीकर)
उपसचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव , मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मा.विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य,
४. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जसंधारण विभाग, मुंबई
९. आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
१०. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)
१४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व) (प्रशासकीय विभागामार्फत)
१६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) (प्रशासकीय विभागामार्फत)
१७. वित्तिय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई
१८. संचालक , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

१९. मा.मंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२१. मा. राज्यमंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२३. मदत व पुनर्वसन विभागातील कार्यासने (क्रमांक ३ /११ /आव्यप्र-१)
२४. निवड नस्ती, म-७